# धर्माचे मूलभूत विवेचन

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


१. व्युत्पत्ती, व्याख्या आणि अर्थ ३९
२. समानार्थी शब्द ( हिंदु धर्म, आर्य धर्म इ. ) ४२
३. निर्मिती ५१
४. धर्म आणि धर्मी ( ईश्वर ) ५१
५. महत्त्व ५२
६. धर्माचे रहस्य ५६
७. धर्मसिद्धान्त ५७
* ईश्वराचे अस्तित्व ५८
* अनेक देव आणि अनेक साधनामार्ग ५८
* मूर्तीपूजा ५९
* ऋणकल्पना ५९
* वर्णाश्रमकल्पना आणि पुरुषार्थकल्पना ६०
* अधर्माचरणींना प्रतिबंध (दंड) आणि अहिंसा ६५
* स्वर्ग आणि नरक अन् पाप आणि पुण्य ६६
* पुनर्जन्म आणि सदेह मुक्ती ६७
८. धर्मलक्षण ६७
९. धर्मप्रमाण ( शास्त्रप्रमाण ) ६८
९ अ. प्रमाण म्हणजे काय ? ६८
९ आ. शास्त्रप्रमाण आणि बुद्धीप्रमाण ६८
९ इ. प्रकार ( वेद, स्मृति, श्रोत्रिय ब्राह्मण इ. ) ६९
१०. धर्माचे प्रकार ( नीतीधर्म, वर्णधर्म, जातीधर्म, स्त्रीधर्म इ. ) ७३

# मनोगत

एकीकडे ‘धर्माविना तरणोपाय नाही’, तर दुसरीकडे ‘धर्म म्हणजे अफूची गोळी आहे’, अशी आत्यंतिक विरोधी वचने ऐकून सर्वसामान्य व्यक्तीचा गोंधळ उडतो. तसेच धर्म म्हटले की, बहुतेकांना हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध इत्यादी शब्द आठवतात, तर काही जणांना भारतात निधर्मी राज्य असल्याची आठवण होते आणि त्यामुळे धर्म म्हणजे एक अस्पृश्य विषय असे त्यांना वाटते. श्री शंकराचार्यांनी धर्माची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे – ‘समाजव्यवस्था उत्तम रहाणे, प्रत्येक प्राणीमात्राची ऐहिक आणि पारलौकिक उन्नती होणे, या गोष्टी ज्याच्यामुळे साध्य होतात तो धर्म.’ या व्याख्येवरून धर्माची महती अन् त्याचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व लक्षात येते.

राष्ट्राच्या संदर्भात धर्माचा विचार केला, तर धर्म हा राष्ट्राचा प्राण आहे; म्हणून समाजाचे जीवन धर्माधिष्ठित असेल, तरच राष्ट्र चिरंतन ठरते, नाहीतर ते मृत्यूमुखी पडते. सद्यस्थितीत धर्माविषयी असलेले अपसमज दूर होणे आवश्यक आहे. सर्व मानवजात एकत्र येण्यासाठी धर्म हा अपरिहार्य आहे. या दृष्टीकोनातून या ग्रंथात धर्म शब्दाचा अर्थ, महत्त्व, प्रकार, धर्माची विविध अंगे आणि रहस्य, धर्मसिद्धान्त, धर्म आणि संस्कृती अन् नीती यांतील भेद, धर्मग्लानी आणि अवतार, धर्माच्या संदर्भात भारताचे महत्त्व, धर्मराज्याची (हिंदु राष्ट्राची) स्थापना इत्यादी विविध सूत्रांचे विवेचन केले आहे. वेद, दर्शने, स्मृति, रामायण, महाभारत आदी मूलाधार धर्मग्रंथांचा उल्लेख या ग्रंथात ओघाने आला आहे. पृष्ठसंख्यावाढीच्या कारणामुळे या धर्मग्रंथांविषयीचे साद्यंत ज्ञान सनातनच्या ‘धर्मग्रंथ’ या ग्रंथात दिले आहे. धर्माच्या अंतर्गत येणारे आणि भारतीय समाजजीवनाचा पाया असलेले चातुर्वर्ण आणि आश्रम यांचे ज्ञानही या कारणास्तव प्रस्तुत ग्रंथात न देता सनातनच्या ‘वर्णाश्रमव्यवस्था’ या ग्रंथात दिले आहे. क्षात्रधर्म अन् राजधर्म या धर्माच्या निराळ्या प्रकारांचे ज्ञान सनातनचा ग्रंथ ‘क्षात्रधर्म आणि राजधर्म’ यात दिले आहे.

हे ग्रंथ वाचून आपण धार्मिक व्हावे आणि साधना करावी, असे काही जणांना तरी वाटो, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**